# ECHO OF HIS CALL

ECHO OF HIS CALL
REACHING NATIONS
SINCE 1969
1969 TO 2029

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India’s National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVII YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2025 SEPTEMBER No. 08


**पवित्र शास्त्र**
कृपया हा शास्त्र भाग पाठ करा
स्तोत्रसंहिता ८१:१-८

१. देव, जो आमचे सामर्थ्य त्याला उंच स्वराने गा, याकोबाच्या देवाचा जयजयकार करा.
२. गीत गाण्यास आरंभ करा, डफ इकडे आणा, सतारीसहित मंजुळ वीणा वाजवा.
३. अमावस्येस, पौर्णिमेस, आमच्या सणाच्या दिवशी, कर्णा वाजवा.
४. कारण हा इस्राएलासाठी नियम आहे, हा याकोबाच्या देवाचा विधी आहे.
५. तो मिसर देशावरून गेला तेव्हा योसेफामध्ये त्याने साक्षीसाठी हा नियम लावला. तेथे जी भाषा मला कळेना ती मी ऐकली.
६. मी त्याचा खांदा भारापासून सारला; त्याचे हात पाटीपासून मुक्त झाले होते.
७. तू संकटात असता आरोळी केली, तेव्हा मी तुला सोडवले; गर्जनेच्या गुप्त स्थानात मी तुला उत्तर दिले, मरीबाच्या जलांजवळ मी तुला पारखले.
८. अहो माझ्या लोकांनो, ऐका, म्हणजे मी तुम्हांला साक्ष देईन, हे इस्राएला, जर तू माझे ऐकशील तर किती बरे!

# कठीण काळातही दृढ रहा आणि धैर्य दाखवा!

**HOLD FAST & BE COURAGEOUS EVEN IN HARD TIMES!** - सिस्टर एंजेल



ज्याच्याकडे असाधारण आणि अलौकिक गोष्टी करण्याची शक्ती आहे, त्या आपल्या प्रभू आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या नावाने तुम्हाला शुभेच्छा. माझा विश्वास आहे की, हा संदेश तुम्हाला कुशलतेने प्राप्त झाला असेल, आणि माझी प्रार्थना आहे की, जशी तुमच्या आत्म्याची समृद्धी होते, तशीच तुमची सुद्धा सर्व बाबतीत समृद्धी व्हावी.

काही दिवसांपूर्वी मी दानिएल अध्याय ३ वाचत होतो. जरी मी हा उतारा यापूर्वी अनेक वेळा वाचला असला, तरी यावेळी त्याने मला अद्भुत आधार आणि आश्वासन दिले. माझ्या मनात आले की, त्यावरील काही विचार तुमच्यासोबत शेअर करावे.

## हिब्रू बांधव!

दानीएलच्या तिसऱ्या अध्यायाची सुरुवात एका नाट्यमय आणि तीव्र दृश्याने होते. तीन हिब्रू तरुण – शद्रक, मेशक आणि अबेदनगो यांना राजा नेबुखदनेझर याने आदेश दिला की, त्याने उभारलेल्या सोन्याच्या मूर्तीपुढे त्यांनी नमन करून तिची उपासना करावी. जेव्हा त्यांनी

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल
यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !
पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी
पाच मिनिटांचा संदेश
इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु
प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून
रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी
✲ कृपा करुन सबक्राईब करा ✲

ECHO OF HIS CALL
REACHING NATIONS
SINCE 1969
1969 TO 2029

# ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.
EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858
95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

**''आणि तुझे बरे व्हावे म्हणून...... यहोवाच्या दृष्टीने जे नीट व बरे तेच तू कर''-अनुवाद ६:१८-१९.**

प्रिय मित्रांनो,

आपल्या प्रभू व तारणहार येशू ख्रिस्ताच्या मौल्यवान नावाने तुम्हांस शुभेच्छा!

तुमच्या उत्कट प्रार्थना, अथक परिश्रम आणि उदार स्वेच्छेने दिलेल्या देणग्यांद्वारे पडद्यामागे माझ्यासोबत विश्वासूपणे उभे राहिलेल्या प्रभूमधील माझ्या सर्व बंधूभगिनींचे मी मनापासून आभार मानतो. तुम्ही माझ्यासाठी देवाची कृपादायक भेट आहात, ज्यामुळे दररोजच्या अडचणी, परीक्षा आणि संकटांमध्येही त्याचे नाव राष्ट्रांमध्ये घोषित करणे शक्य होते.

माझ्याबद्दल सांगायचे तर, माझ्या जीवनातल्या देवाच्या जितक्या साक्षी आहेत त्यांना मी घट्ट धरून राहिलो आहे आणि मला विश्वास आहे की, तो मला लज्जित करणार नाही. स्तोत्रकर्ता स्तोत्र ११९:३१ मध्ये म्हणतो: ''**मी तुझ्या साक्षींस चिकटून आहे, हे यहोवा, तू मला लज्जित करू नको.**''

चिकटून राहणे याचा अर्थ घट्ट धरून ठेवणे, एकरूप होणे, न सोडणे, आणि स्थिरतेने टिकून राहणे. जेव्हा देवाने आपल्या लोकांना त्याची आज्ञा दिली, तेव्हा एक गोष्ट वारंवार सांगण्यात आली ती म्हणजे, घट्ट धरून रहा किंवा मजबूतीने जोडलेले असा. या अटल वचनबद्धतेशिवाय, देवाने दिलेली उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी साधकांसाठी दुसरा कोणताही मार्ग नाही.

वैयक्तिकरित्या, मी देवाला चिकटून राहण्याचा हा प्रवास माझ्या लहानपणापासूनच सुरू केला. मला हे समजले की, यशस्वी आध्यात्मिक वाटचाल ही सोप्या आणि सुखद मार्गावर होत नाही. घट्ट धरून राहण्यासाठी, दृढ राहण्यासाठी, आणि पूर्ण मनाने त्याच्याशी एकरूप राहण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

ते केवळ शब्द नाही आहेत, तर त्यामध्ये खोल आत्मिक अनुभवांचे प्रतिबिंब आहे. सूर्यप्रकाश असो वा वादळ, अपयश असो वा फसवणूक, एकटेपणा, आजारपण, हानी असो की दु:ख, परीक्षा किंवा प्रलोभन, या सर्वांमध्ये देवाला घट्टपणे जोडून राहणे आवश्यक आहे याविषयी ते सूचित करतात.

जशी एखादी वस्तू दुसऱ्या वस्तूला घट्ट चिकटलेली असेल तर ती सहजपणे वेगळी करता येत नाही, तसेच आपले जीवन प्रभू येशू ख्रिस्ताशी घट्टपणे जोडलेले असावे. जेव्हा आपण खरोखरच त्याच्याशी चिकटून राहतो, तेव्हा तो आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनतो.

हेच ते जीवन आहे, जे सरकणाऱ्या वाळूवर नाही, तर भक्कम खडकावर बांधलेले असते.

आपण आज आपल्या स्वत:च्या जीवनात पवित्र शास्त्रामधील घटना पूर्ण होताना पाहू शकतो. विविध धर्मांतील आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांतील लोक ही साक्ष देतील की, प्रभू देव, येशू ख्रिस्त, आजही जिवंत आहे आणि आपल्या मध्ये कार्यरत आहे.

कधी कधी, जीवनाच्या मरुभूमीतल्या अनुभवांमध्ये देवाला घट्ट धरून ठेवणे, त्याच्याशी चिकटून राहणे, किंवा त्याच्याबरोबर एकरूप होणे यामुळे ताण तणाव निर्माण होऊ शकतो, आणि आपल्या देवासोबतच्या नात्यातही तडे जाऊ शकतात. तथापि, देवाचे वचन आपल्याला खात्री देते:

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) YouTube Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

''**परंतु यहोवा तुमचा देव याला तुम्ही जे लगटून राहिला ते तुम्ही सगळे आजपर्यंत जिवंत आहा**''- अनुवाद ४:४.

प्रभु येशू ख्रिस्ताला घट्ट धरून राहणे हेच आपले ब्रीदवाक्य असू द्या. हाच तो दृढ विश्वास आहे, जो आपल्याला जीवनातील परीक्षांतून विजयाने मार्ग काढायला मदत करील, आणि आपल्याला अजिंक्य आणि यशस्वी बनवील.

ही दृढ वचनबद्धता देवाच्या भक्तिभावयुक्त भीतीमध्ये रुजलेली असावी, जी आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात परावर्तित होत असते.

तुम्ही माझ्या प्रार्थनांमध्ये आहात. प्रभु येशू ख्रिस्ताला घट्ट धरून रहा. तुमच्या आयुष्याचा उर्वरित प्रवास आशीर्वादित आणि फलदायी ठरेल.

आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा सदैव तुमच्यासोबत असो.

बंधूंनो, कृपया आमच्यासाठी प्रार्थना करत राहा.

येशू ख्रिस्तामध्ये तुमचा सेवक,

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज**

E.mail : sam@echoofhiscall.org

(पान १ वरुन...)

असे करण्यास नकार दिला, तेव्हा त्यांना धगधगत्या अग्नीच्या भट्टीत टाकण्यात आले.

आपण अध्याय ३ मध्ये सखोल जाण्यापूर्वी, संदर्भासाठी अध्याय २ वर थोडक्यात नजर टाकणे महत्त्वाचे आहे. त्या अध्यायात राजा नबुखद्नेस्सरला एक अस्वस्थ करणारे स्वप्न पडते. राजाने एका मूर्तीचे स्वप्न पाहिले – **तिचे शीर उत्तम सोन्याचे होते, ऊर व बाहू रुप्याचे होते, पोट आणि मांड्या पितळेच्या होत्या, पाय**



*राजा नबुखद्नेस्सरला एक त्रासदायक स्वप्न पडले.*

**लोखंडाचे होते, आणि तिची पावले काही अंश लोखंडाची व काही अंश मातीची होती** (दानिएल २:३१-३३).

राजा त्या स्वप्नाचा अर्थ समजून घेण्यासाठी दानीएलला बोलावतो. **दानीएल राजाला स्पष्ट करतो की, सोन्याचे शीर म्हणजे स्वत: राजा नबुखद्नेस्सर प्रतीक म्हणून आहे, आणि त्याच्यानंतर इतर राज्ये उदयास येतील, पण त्यापैकी कोणतेही त्याच्या इतके तेजस्वी किंवा सामर्थ्यवान नसेल** (दानीएल २:३८-३९).

आपल्याला अध्याय २ आणि अध्याय ३ यामधील नेमका वेळ सांगितलेला नाही, परंतु असे वाटते की, राजाच्या मनात काहीतरी अस्वस्थता होती. कदाचित त्याच्या मनात विचार आला असेल की, मी एक दिवस निघून जाईन, आणि माझ्यानंतर कोणी तरी दुसरा राज्य करेल. पण माझी इच्छा आहे की, लोक माझ्या राज्याला 'सुवर्ण युग' म्हणून ओळखावे. गर्वामुळे किंवा असुरक्षिततेच्या भावनेने प्रेरित होऊन, त्याने एक भव्य सोन्याची मूर्ती उभारायचा निर्णय घेतला, बहुधा स्वत:चीच , आणि सर्वांना आदेश दिला की, त्यांनी त्या मूर्तीपुढे नमन करून आदर व्यक्त करावा.

## १) स्वातंत्र्याशी बांधलेले!

दानीएल ३:२१ – ''**तेव्हा त्या पुरुषांस त्यांचे पायमोजे, अंगरखे, झगे वगैरे वस्त्रांसहित बांधून धगधगीत अग्नीच्या भट्टीत टाकिले.**''

राजाला वाटले की, त्याने त्यांना बांधले आहे, आणि त्यांना धगधगत्या भट्टीच्या मध्यभागी टाकून त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे. शत्रूनेही कदाचित असेच मानले असेल की, त्याने देवाची



*देवाची एक महान योजना होती.*

योजना यशस्वीरित्या उलथवून टाकली आहे, तिला रोखले आहे, प्रलंबित केले आहे किंवा पूर्णपणे नष्टच केले आहे. पण देवाची योजना खूप मोठी होती.

क्षणभर, त्या तीन हिब्रू पुरुषांचा शेवट होणार असल्याचे दिसले. सैतानाने कदाचित आनंद साजरा केला असेल, जेव्हा देवाने त्वरित हस्तक्षेप केला नाही. अनेकदा, जेव्हा आपण प्रार्थना करतो तेव्हा देव लगेच उत्तर देतो. पण काही वेळा, देव शांत असतो; कधी कधी ही शांतता वर्षानुवर्षे कायम असते. ही शांतता आपल्या विश्वासाला धक्का देऊ शकते आणि आपल्याला हार मानण्यास प्रवृत्त करू शकते.

## अत्यंत महत्त्वाची सुचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे ताबडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६०००05, भारत**
Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org

मला तुमच्याबद्दल माहिती नाही, पण मी असे काही वेळा अनुभवले आहे, जेव्हा प्रार्थना केल्यानंतर गोष्टी सुधारण्याऐवजी त्या आणखी बिघडत गेल्या. जर आपण हिब्रू भावांच्या या कथेकडे पाहिले, तर असे दिसते की, त्यांनी आपल्या विश्वासाची धाडसी कबुली दिल्यानंतर, भट्टीतील आग अधिक धगधगती करण्यात आली – सात पट अधिक तीव्र करण्यात आली.

प्रिय मित्रा, कदाचित तू स्वतःला असा प्रश्न विचारत असशील की, प्रभू, हे अधिकाधिक वाईटच का होत चालले आहे? मी तर प्रार्थना करीत होतो, मग तू हे का घडू दिलेस?

हो, देव नक्कीच त्यांना त्या भट्टीत टाकले जाण्यापासून थांबवू शकला असता. तो भट्टीतील ज्वाळा त्यांच्या आत जाण्यापूर्वीच शांत करू शकला असता. पण देवाने त्याहूनही महान काहीतरी केले, तो त्यांच्याकरिता त्या आगीतच आधीपासून त्यांची वाट पाहत होता. तो आधीच तिथे होता, त्यांना आपल्या हातांनी सावरण्याकरिता.

जेव्हा त्यांना भट्टीत टाकण्यात आले, तेव्हा मला वाटते की, ते थेट देवाच्या अनंतकालीन कुशीत पडले असणार. तो त्यांच्या आधीच पुढे गेला होता. देव नेहमीच आपल्यापुढे जातो; आगीतही आपले रक्षण करण्यासाठी पुढे चालतो. अग्नीच्या भट्टीच्या मध्यभागीही तो तिथे असतो. तुम्ही एकटे नाही आहात. तुम्हाला बळकटी देण्यासाठी, तुम्हाला आधार देण्यासाठी तो तुमची वाट पाहत असतो.

देवाच्या परवानगीशिवाय आपल्या जीवनात काहीच घडत नाही. आपल्याला हानी पोहोचवण्यासाठी नाही, तर येणाऱ्या पिढ्यांसाठी जिवंत साक्षीदार म्हणून आपला उपयोग करण्यासाठी तो आपल्याला तीव्र संघर्षाचे काळ अनुभवू देतो. आपले जीवन आणि आपली साक्ष ठामपणे टिकून राहील. देवाने आपल्याला वारसा मागे सोडण्यासाठी बोलावले आहे.

## २) मोकळेपणाने फेरफटका मारणे!

जेव्हा त्या तिघांना आगीत टाकण्यात आले तेव्हा त्यांचे सर्व बंधने सुटली. त्यांचे



*चार पुरुष मोकळे सुटलेले, आगीच्या मध्यभागी चालत आहेत.*

हातपाय बांधणारे दोरखंड नष्ट झाले होते. प्रभूच्या उपस्थितीत ते स्वतंत्र होते; देवाच्या पुत्रासह ते अग्नीत सुरक्षितपणे फिरत होते. .... **"चार इसम अग्नीत मोकळे फिरत आहेत असे मला दिसते; त्यांस काहीएक इजा पोहोचली नाही;....."**- दानीएल ३:२५.

तमिळ पवित्र शास्त्रामध्ये हे वचन अत्यंत सुंदर रीतीने नमूद केले आहे; ते केवळ चालत होते असे नाही, तर ते मोकळेपणाने, आनंदात फेरफटका मारीत होते, असे वर्णन करण्यात आले आहे. काय विलक्षण दृश्य! ज्याठिकाणी त्यांचा विनाश व्हावा अशी योजना होती, त्याच ठिकाणी ते मुक्त झाले होते.

प्रिय भावांनो आणि बहिणींनो, कदाचित तुम्ही आत्ता स्वतः आगीच्या मध्यभागी असल्याचा अनुभव करीत असाल. पण जोपर्यंत तुम्ही देवाच्या सान्निध्यात राहता तोपर्यंत तुम्ही मुक्त आहात. तो प्रत्येक बंधन तोडण्यास सक्षम आहे. येशू ख्रिस्ताच्या रक्तात स्वातंत्र्य आहे.

मला वाटणारे सर्वात मोठे आश्चर्य हे आहे की, फक्त त्यांचे मोकळे होणेच विलक्षण नव्हते, तर ते काय करीत होते हे अधिक अद्भुत होते: ते आपल्या सृष्टीकर्त्यासोबत फेरफटका मारीत होते!

विचार करून पाहा – आपण फेरफटका कधी मारतो? लोक सहसा उद्यानांमध्ये किंवा बागेमध्ये फेरफटका मारतात; ते शांतपणे, घाई न करता, निसर्गाचा आनंद घेत, किंवा एखाद्या प्रिय व्यक्तीच्या संगतीत, कोणताही ताण न घेता, चिंता न करता आणि अगदी आरामात निवांतपणे चालतात.

तुम्ही कल्पना करू शकता का? शद्रख, मेशख आणि अबेद-नगो धगधगत्या भट्टीच्या मध्यभागी शांतपणे आणि कोणत्याही तणावाशिवाय फिरत होते! शत्रूला वाटले की, त्याने त्यांना संपवले आहे, पण त्याला एका महान सत्याची जाणीव नव्हती: देव त्यांच्या पाठीशी होता.

**आत्मविश्वासाने मोठ्याने म्हणा: "देव माझ्या पाठीशी आहे!"**


## ३) इजा पोहोचली नाही!

फक्त त्यांचे हातपायच मोकळे झाले होते असे नाही, ते प्रभूसोबत चालत होते इतकेच नाही, तर त्यांस काहीएक इजा पोहोचली नाही. दानिएल ३:२५ हे वचन स्पष्ट सांगते की, "......**त्यांस काहीएक इजा पोहोचली नाही**......"

**हे कसे शक्य आहे?**

याचा अर्थ असा की, त्या आगीचा त्यांच्यावर किंचितही ठसा नव्हता – ना भाजलेले शरीर, ना फोड, ना धुराचा वाससुद्धा! देवाने त्यांना इतके पूर्णपणे झाकून टाकले होते की, जणू ते कधीही आगीत पडले नव्हते.

माझ्या कल्पनेप्रमाणे मला असे वाटते की, जेव्हा त्यांना भट्टीकडे नेले जात होते, तेव्हा ते स्तोत्र २३ गात असावेत: **"मृत्युछायेच्या दरीतूनही मी जात असलो**



*हो, मृत्यू छायेच्या दरीतून मी जरी जात असलो तरी अरिष्टास भिणार नाही!*

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - सप्टेंबर, २०२५ पासून ते १८ ऑक्टोबर, २०२५

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

१९ सप्टेंबर - आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन शाळेचे** मुख्याध्यापक, शिक्षक आणि कर्मचारी यांच्यासाठी देवाची स्तुती करा.

२० सप्टेंबर - आमच्या सहाय्यक संपादकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

२१ सप्टेंबर - आमच्या **बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्स** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्सला** मिळत असलेला वाढता प्रतिसाद यासाठी देवाची स्तुती करा.

२२ सप्टेंबर - आमच्या कामगारांच्या कुटुंबांवर देव करीत असलेल्या आशीर्वादाचा वर्षाव यासाठी देवाची स्तुती करा.

२३ सप्टेंबर - आमच्या प्रार्थनेमध्ये सहभागीदार असलेले, तसेच सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

२४ सप्टेंबर - ऑगस्ट महिन्यात आपल्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी देवाने केलेली विश्वसनीय तरतूद यासाठी देवाची स्तुती करा.

२५ सप्टेंबर - १० ऑगस्ट २०२५ रोजी **एको ऑफ हिज कॉल** ही आपली सेवा ५७व्या वर्षात पदार्पण करीत आहे, देवाचे मनापासून आभार म्हणून आपण देवाची स्तुती करा.

२६ सप्टेंबर - **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलमधील** नवीन प्रवेशांवर देवाने कृपा पुरवली यासाठी देवाची स्तुती करा.

२७ सप्टेंबर - मुख्य मंडळी आणि आमच्या इतर सर्व शाखीय मंडळींमधील रविवारच्या सेवांद्वारे देवाच्या वचनांद्वारे प्रकट होणारे सामर्थ्य यासाठी देवाची स्तुती करा.

२८ सप्टेंबर - आमच्या संध्याकाळच्या **नहेम्या बायबल कॉलेजच्या** बॅचेसमध्ये देव नवीन विद्यार्थ्यांना घेऊन येत आहे यासाठी देवाची स्तुती करा.

२९ सप्टेंबर - आमचे मिशन कार्यकर्ते दाखवत असलेल्या खोल निष्ठेबद्दल आम्ही अत्यंत कृतज्ञ आहोत यासाठी देवाची स्तुती करा.

३० सप्टेंबर - आमचे वरिष्ठ पास्टर आणि सुवार्तेच्या प्रचारासाठी त्यांनी दाखवलेले अढळ समर्पण याबद्दल आम्ही मनापासून कृतज्ञ आहोत यासाठी देवाची स्तुती करा.

०१ ऑक्टोबर - देवाच्या कृपेने आमच्या अंतर्गत छपाई यंत्रणेद्वारे आमचे मासिक १६ भाषांमध्ये मुद्रित व प्रकाशित करण्यास आम्ही सक्षम होत असतो, आणि त्याद्वारे आम्ही ते विविध मिशन क्षेत्रांमध्ये पोहोचवू शकतो यासाठी देवाची स्तुती करा.

०२ ऑक्टोबर - **एको ऑफ हिज कॉल युट्युब** मीडिया मिनिस्ट्री मार्फत शेअर केल्या गेलेल्या ५ मिनिटांच्या संदेशांद्वारे मिळालेल्या उत्साहवर्धक साक्षींसाठी आम्ही मनापासून आभारी आहोत यासाठी देवाची स्तुती करा.

०३ ऑक्टोबर - **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज,** आणि **बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्सेस** या प्रत्येक सेवांवर देवाची असलेली नियमित कृपा आणि आशीर्वाद यासाठी देवाची स्तुती करा.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

०४ ऑक्टोबर - नियमित धार्मिक चर्चासत्रे आयोजित करण्यासाठी देवाचे मार्गदर्शन लाभावे यासाठी प्रार्थना करा.

०५ ऑक्टोबर - सर्व राष्ट्रांच्या एकतेसाठी आणि शांतीसाठी प्रार्थना करा.

०६ ऑक्टोबर - देव आपल्या सहाय्यक संपादकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादित करण्यासाठी प्रार्थना करा.

०७ ऑक्टोबर - आमचे सह भागीदार, राज्य समन्वयक, आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी प्रार्थना करा.

०८ ऑक्टोबर - संपूर्ण जगभरातील लोकांच्या सुरक्षिततेसाठी आणि कल्याणासाठी प्रार्थना करा.

०९ ऑक्टोबर - **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलच्या** (ग्रामीण हायस्कूल) नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी प्रार्थना करा.

१० ऑक्टोबर - आपल्या गॉस्पेल प्रिंटिंग प्रेसला देवाने अधिक आशीर्वादित करावे यासाठी प्रार्थना करा.

११ ऑक्टोबर - आपले ज्येष्ठ पास्टर एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांच्या उत्तम आरोग्यासाठी व सर्वांगीण कल्याणासाठी प्रार्थना करा.

१२ ऑक्टोबर - सर्व राष्ट्रांतील विश्वासणाऱ्यांमध्ये देवासोबतच्या त्यांच्या संबंधांमध्ये प्रामाणिकपणा असावा यासाठी प्रार्थना करा.

१३ ऑक्टोबर - तरुणांमधील सेवा व प्रचार कार्य यासाठी प्रार्थना करा.

१४ ऑक्टोबर - जगातील विविध भागांतील आर्थिक मंदीचा अंत व्हावा यासाठी प्रार्थना करा.

१५ ऑक्टोबर - संपूर्ण जगभरातील मिशनरी कार्यकर्त्यांचे देवाकडून संरक्षण व्हावे यासाठी प्रार्थना करा.

१६ ऑक्टोबर - प्रत्येक राष्ट्राचे नेतृत्व नीतिमान नेत्यांकडून व्हावे यासाठी प्रार्थना करा.

१७ ऑक्टोबर - वंचित आणि उपेक्षित लोकांचे आर्थिक सशक्तीकरण व्हावे यासाठी प्रार्थना करा.

१८ ऑक्टोबर - सर्वत्र लोकांना नैसर्गिक आपत्तींपासून देवाकडून संरक्षण लाभावे यासाठी प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

**तरी कसल्याही अरिष्टाला भिणार नाही, कारण तू माझ्याबरोबर आहेस; तुझी आंकडी व तुझी काठी मला धीर देतात''** – स्तोत्र २३:४.

आणि खरोखरच तो त्यांच्यासोबत होता, त्याने वचन दिल्याप्रमाणे, त्यांना सांत्वन आणि सुटका करण्याची तो वाट पाहत होता.

*त्याच्या अमूल्य अभिवचनांपैकी काही येथे सांगितले आहे!*

जखऱ्या २:८ – **''....... जो कोणी तुम्हांस स्पर्श करील तो त्याच्या डोळ्याच्या बुबुळालाच स्पर्श करील....''**

यशया ४९:१६ – **''पाहा, मी तुला आपल्या तळहातावर कोरून ठेवले आहे;......''**

स्तोत्र ९१:११ – **''कारण तुझ्या सर्व मार्गांत तुझे रक्षण करण्याची तुझ्याविषयी तो आपल्या दिव्यदूतांना आज्ञा देईल.''**

स्तोत्र १२१:७ – **''परमेश्वर सर्व अनिष्टांपासून तुझे रक्षण करील. तुझ्या जीवाचे रक्षण करील.''**

योहान १०:२८ – **''मी त्यांना सार्वकालिक जीवन देतो, त्याचा कधीही नाश होणार नाही आणि त्यांना माझ्या हातातून कोणी हिसकून घेणार नाही.''**

प्रिय मित्रांनो, तुम्ही सध्या कोणत्याही गंभीर किंवा गुदमरणाऱ्या परिस्थितीत असलात, तरी तुम्ही त्यातून कोणत्याही हानीशिवाय बाहेर पडाल. फक्त देवाला धरून राहा. जिथे मार्ग नाही तिथे तो मार्ग काढील.

तुम्ही एखाद्या अनैतिक नात्यात अडकलेले असू शकता, आर्थिक संकटात बुडालेले असू शकता, गंभीर आरोग्य समस्यांशी झुंज देत असू शकता, एखाद्या कायदेशीर लढ्यात अडकलेले असू शकता, किंवा प्रिय व्यक्तीच्या निधनाच्या दुःखात असू शकता. पण हे लक्षात ठेवा – देव तुमच्या पाठीशी आहे.

त्याच्या अभिवचनांवर दावा करा. वादळात त्याची स्तुती करीत राहा. तुमची कोणतीही हानी न होता तो तुम्हाला त्या परिस्थितीतून बाहेर काढील किंवा तुम्हाला ते सहन करण्याची कृपा पुरवील.

अगदी त्या तीन हिब्रू पुरूषांप्रमाणेच, पूर्णपणे सुरक्षित ते आगीतून बाहेर आले!

## ४) आगीचा कोणताच परिणाम झाला नाही!

दानीएल ३:२७ मध्ये लिहिले आहे, ''..... **अग्नीचा परिणाम झाला नव्हता....''**

याचा अर्थ असा की, तुम्ही ज्या परिस्थितीत आहात त्याचा तुमच्यावर काहीच अधिकार नाही. हालेलुया!

राजा आणि त्याच्या अधिकाऱ्यांना वाटले की, आग त्यांना भस्म करील. पण प्रत्यक्षात जे घडले ते आश्चर्यचकित करणारे होते: आगीने परिणाम ठरवला नाही, मात्र इब्री पुरुषांनी देवाच्या सामर्थ्याने परिस्थितीवर नियंत्रण मिळवले.

तुम्हांला मला हे सांगू द्या की, तुमच्या परिस्थितीला तुमच्यावर कोणताही अधिकार नाही, जोपर्यंत तुम्ही तो अधिकार तिला देत नाही.


तुमच्या परिस्थितीला शरण जाऊ नका, जेणेकरून ती तुमचे भय, वेदना किंवा संकट यांच्यावर नियंत्रण ठेवतील. परिस्थितीला तुमच्यावर वर्चस्व गाजवू देऊ नका. देवाचे मूल म्हणून, तुम्ही त्याचे अधिकार धारण करता. आग खरी असू शकते, परंतु चौथ्या पुरूषासोबत चालणाऱ्याविरुद्ध ती शक्तीहीन आहे!

## ५) यामुळे देवाचे गौरव झाले!

आपल्या जीवनातील प्रत्येक घटना, मग ती आनंददायी असो वा वेदनादायी, त्याचा एकच दैवी उद्देश असतो तो म्हणजे, त्यातून देवाचे गौरव होणे.

हो, अगदी दुःखातही. अगदी नुकसानीतही. अगदी आगीतही.

**चमत्कार पाहिल्यानंतर, राजा नबुखदनेस्सरने घोषित केले: ''शद्रख, मेशख व अबेद्नगो यांनी आपल्या देवावर भाव ठेवला, राजाचा शब्द मोडला,**



*राजा नबुखद्नेस्सरचा आदेश.*

**आपल्या देवाखेरीज अन्य देवाची सेवा व उपासना करावयाची नाही म्हणून त्यांनी आपले देह अर्पिले, त्यांस त्यांच्या देवाने आपला दिव्यदूत पाठवून सोडविले आहे;**

(...पान ८ वर)

ECHO OF HIS CALL REACHING NATIONS SINCE 1969
1969 TO 2029

# नहेम्या बायबल कॉलेजेस

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई

प्रवेशा करिता त्वरा करा !

माध्यम : तमिळ (अर्धवेळ)

हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)

ईश्वरविद्या डिप्लोमा

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५५ वर्षांपासून मान्यता प्राप्त

* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१३. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१४. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१५. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१६. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१७. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१८. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. इंग्रजी आणि हिंदी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२१. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२२. स्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२३. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२४. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२५. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२६. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२७. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार६
२८. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२९. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३०. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३१. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३२. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा)
३३. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३४. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

**केवळ भारतातील उमेदवारां करीता**

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला **'न्यु लाईफ फॉर यू'** या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान अभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज**
**एको ऑफ हिज कॉल,** पोस्ट बॉक्स नं. २९५७, चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

**मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी**

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## नम्र सेवकाईचा सन्मान करणारा प्रभू

कोणतीही किंमत मोजून, कोणत्याही प्रकारे, आणि सर्व मार्गांनी प्रभूच्या महिमायुक्त सुवार्तेच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी, माझ्या सुरुवातीच्या दिवसांपासूनच प्रभूने मला एक विशेष रुची आणि तितकंच एक भारी ओझं दिलं होतं, जेणेकरून त्यांना येशू ख्रिस्ताच्या तारणाचा अनुभव घेता यावा (१ करिंथ ९:२२). एके दिवशी, मी असा निर्णय घेतला की, रोज किमान एका व्यक्तीला तरी प्रभु येशू ख्रिस्ताच्या प्रेमाविषयी सांगायचे, मग ते एक सुवार्ता पत्रक देऊन असो किंवा वैयक्तिकरित्या ख्रिस्ताचे प्रेम सामायिक करून असो. प्रभू आजही मला हा निर्णय पूर्ण करण्यासाठी मदत करीत आहे.

जेव्हा मी तमिळनाडू सरकारमध्ये नोकरी करीत होतो, साल १९७१ पासून, मी एक अशी सवय लावून घेतली होती की, घरातून ऑफिसला जाताना आणि परत येताना मी लोकांमध्ये सुवार्ता पत्रके वाटत असे. जेव्हा मी या सेवेत होतो, तेव्हा मला हजारो गैर-ख्रिस्ती लोकांना तसेच काही धार्मिक लोकांना भेटता आले. याशिवाय, या सेवेद्वारे, वाढलेल्या संपर्कांमुळे मी चेन्नईमध्ये मंडळीची सेवा सुरू करू शकलो.

मला पुरेसे साहित्य मिळवणे कठीण जात होते, म्हणून मी स्थानिक छपाई केंद्रांमध्ये जाऊन माझ्या मोफत वितरणासाठी सुवार्ता साहित्य छापून घेण्यास सुरुवात केली. माझ्या सेवेसाठी सुवार्ता पत्रके छापण्यास मुद्रणालयाचे मालक फारसे खुश नव्हते. यामुळे मला अनेक वेळा गैरसोयीचे वाटायचे. अशा सर्व प्रतिकूल परिस्थितीतही, प्रभूने मला सेवाकार्य चालू ठेवण्यास मदत केली.

इतर धर्माच्या मित्रांना सुवार्तेच्या पत्रिका वाटताना माझ्यावर अनेक वेळा शारीरिक हल्ला झाला. पण देवाने मला वाईट शक्तींपासून वाचवले आणि त्याच्या सेवेत पुढे सरसावण्यास अधिक मदत केली.

ज्या प्रभूची मी विश्वासूपणे सेवा केली, तो आता रस्त्यांवर आणि बाजारपेठेत सुवार्तेच्या पत्रिका वाटण्याच्या माझ्या नम्रपणे करीत असलेल्या सेवेचा आदर करतो. आणि त्याने मला ''मिनिस्ट्री ऑफ गॉस्पेल लिटरेचर'' ही सेवा प्रदान करून आशीर्वादित केले आहे, ज्यामध्ये पुरेसा कुशल कर्मचारीवर्ग, अत्याधुनिक छपाई यंत्रणा, इमारती आणि इतर सर्व आवश्यक सुविधा आहेत. आता, जसे की, तुम्हाला माहीत आहे, देवाच्या कृपेने ही सेवा विविध देशांतील लोकांपर्यंत येशू ख्रिस्ताची सुवार्ता पोहोचवण्यास सक्षम झाली आहे. आम्ही सुवार्ता साहित्य १६ भाषांमध्ये भाषांतरित करून प्रकाशित करतो, जसे इंग्रजी, तमिळ, मल्याळम, तेलुगू, हिंदी, मराठी, कन्नड, बंगाली, गुजराती, ओडिया, आसामी, पंजाबी, उर्दू, नेपाळी, सिंहली आणि आफ्रिकान्स. आमच्या मुख्य मंडळीमध्ये प्रत्येक रविवारी आम्ही पाच भाषांमध्ये उपासनेच्या सभा घेतो, त्या म्हणजे, इंग्रजी, तमिळ, मल्याळम, तेलुगू आणि हिंदी.

**येशू ख्रिस्त तुमच्या जीवनातसुद्धा महान कार्य करू शकतो** (स्तोत्र १२६:३). ''**जे अश्रूपूर्ण नेत्रांनी पेरणी करितात ते हर्षाने कापणी करतील**'' - स्तोत्र १२६:५.

************

(पान ६ वरुन)

**त्याचा धन्यवाद असो. ह्यांकरिता मी फर्मावतो की, सर्व लोक, प्रत्येक राष्ट्रांचे, व प्रत्येक भाषा बोलणारे लोक, यांपैकी जे कोणी शद्रख, मेशख व अबेद्‌गो यांच्या देवाविरुद्ध काही बोलतील त्यांचे तुकडे-तुकडे करण्यात येतील; त्यांच्या घराचे उकिरडे करण्यांत येतील; कारण अशाप्रकारे सोडविण्यास समर्थ दुसरा कोणी देव नाही. नंतर राजाने शद्रख, मेशख व अबेद्‌गो यांस बाबेल परगण्यांत मोठ्या हुद्द्यांस चढविले**'' (दानीएल ३:२८-२९).

देवाने आगीला परवानगी दिली. त्याने ती आणखी तीव्र होऊ दिली. का? सर्वप्रथम, कारण तो तुम्हावर विश्वास ठेवतो की, तुम्ही विश्वासाने त्या परिस्थितीतून मार्ग काढाल.

दुसरे, कारण तो तुमच्या साक्षीचा उपयोग त्याच्या नावाचे गौरव करण्यासाठी करील.

माझ्या बंधू-भगिनींनो, म्हणूनच धैर्य धरा; तुम्ही सध्या ज्या परिस्थितीतून जात आहात, ती व्यर्थ नाही आहे. या परिस्थितीमुळे देवाला गौरव मिळेल, आणि तुम्ही या अग्नीतून त्याचे शक्तिशाली पात्र, परिष्कृत आणि तेजस्वी म्हणून बाहेर पडाल.

### ६) पदोन्नती!

कधी कधी आपल्याला असं वाटू शकतं, ''याचा अर्थ काय? जर सर्व महिमा आणि सन्मान देवालाच मिळणार असेल, जर केवळ त्यालाच उंच करण्यात येणार असेल, तर मग या सर्वात माझं स्थान कुठे आहे?''

पण दानीएल ३ मधील आपण जेव्हा उर्वरित कथा वाचतो तेव्हा एक सुंदर सत्य आपल्यासमोर उभं राहतं: देव त्याच्यावर विश्वास ठेवून निष्ठेने चालणाऱ्यांना प्रतिफळ देणारा आहे.

शद्रक, मेशक आणि अबेद-नेगो यांना केवळ आत्मिक पातळीवरच सन्मान मिळाला नाही, तर पृथ्वीवरही त्यांना प्रत्यक्षपणे बक्षिस मिळाले. "**नंतर राजाने शद्रख, मेशख आणि अबेदनेगो यांस बाबेल परगण्यांत मोठ्या हुद्द्यास चढविले**" (दानीएल ३:३०).

त्यांचे प्राण घेणे, राजासोबतचा त्यांचा आदर संपवणे, त्यांची सेवा समाप्त करणे, त्यांचा विश्वास नष्ट करणे, त्यांच्या जीवनासाठी असलेली देवाची योजना मोडून काढणे, त्यांच्या परीक्षेचे साक्षीदार असलेल्या इतरांचा विश्वास संपवणे, आणि शेवटी, देवाच्या राज्याचा विस्तार थांबवणे – हेच त्या सर्व गोष्टींचे अंतिम उद्दिष्ट होते; पण तसं काहीही झालं नाही.

त्याऐवजी, देवाने शत्रूचा डाव उलथवून टाकला आणि परिस्थितीचा वापर करून पृथ्वीवर त्याचे राज्य वाढवले आणि मजबूत केले.

त्या आगीने काय साध्य केले ते पहा: तिने देवाची योजना पूर्ण केली. त्यामुळे देवाचे गौरव झाले. यामुळे केवळ त्यांचाच विश्वास नाही तर इतर यहुद्यांचा आणि अगदी राजासारख्या गैर-यहुदी लोकांचाही विश्वास बळकट झाला. परिणामी, देव आणि माणूस (राजा) दोघांच्याही नजरेत त्यांना कृपा मिळाली. यामुळे त्यांचे जीवन संपले नाही; उलट, त्यांना एक नवीन सुरुवात मिळाली – एका नव्या उद्देशाची, दर्शनाची, आणि पदाची. यावरून हे सिद्ध झाले की, **शत्रूने वाईट योजले होते, मात्र ते देवाने चांगल्यासाठी योजले होते** (उत्पत्ती ५०:२०).

जो राजा एकेकाळी सर्वांना सुवर्णमूर्तीला नमन करण्याची आज्ञा देत होता, त्यानेच नंतर सार्वजनिकरीत्या इस्राएलाच्या देवाची सर्वोच्चता जाहीर केली: "**अशाप्रकारे सोडविण्यास समर्थ दुसरा कोणी देव नाही**" (दानीएल ३:२९).

## ७) वारसा मागे सोडून जाणे!

शेवटी, त्या तीन हिब्रू पुरुषांनी एक शक्तिशाली आणि चिरस्थायी वारसा मागे सोडला – अढळ विश्वासाचा वारसा जो आजही, २०२५ मध्ये आपल्याशी बोलत आहे.

देवाने त्यांना अग्नीत जाऊ दिले, जेणेकरून ते येणाऱ्या पिढ्यांसाठी साक्ष म्हणून उभे राहू शकतील. त्यांची कहाणी आपल्याला आव्हान देते आणि प्रभूसाठी त्याच आवेशाने जगण्याची प्रेरणा देते.

### त्यांनी धैर्याने घोषित केले:

"**ज्या देवाची आम्ही उपासना करतो तो आम्हांस धगधगीत अग्नीच्या भट्टीतून सोडवावयाला समर्थ आहे; महाराज, तो आम्हांस आपल्या हातांतून सोडवील. ते कसेही असो, पण महाराज, हे आपण पक्के समजा की आम्ही आपल्या दैवतांची उपासना करणार नाही आणि आपण स्थापिलेल्या सुवर्णमूर्तीला दंडवत घालणार नाही**" (दानीएल ३:१७-१८).

प्रभूबद्दल त्यांच्यात किती धाडस आणि दृढनिश्चय होता ते पहा! ते त्यांच्या विश्वासाशी तडजोड करण्याऐवजी मृत्यूला तोंड देण्यास तयार होते.

जेव्हा गोष्टी आपल्या मनाप्रमाणे होत नाहीत तेव्हा आपण किती वेळा निराश होतो? आणि तरीही या तरुणांनी, त्यांच्या दृढ श्रद्धेने, केवळ त्यांचा स्वतःचा विश्वासच नाही तर आपलाही विश्वास मजबूत केला आहे.

### *मला तुम्हाला हे विचारू द्या:*

अपयशाच्या काळात किंवा आजारपणाच्या काळात, कौटुंबिक-संघर्षांच्या काळात, आरोग्यविषयीच्या आव्हानांच्या काळात, व्यावसायिक ताण-तणावाच्या काळात, वैयक्तिक दुःखाच्या काळात, वारं वार येणाऱ्या नैराश्येच्या काळात, भग्नावस्थेतल्या काळात, आशीर्वाद आणि विपुलतेच्या काळात तुम्ही देवाची सेवा करू शकता का?

**मागे वळू नका.**



***तो आपल्या समीप आहे आणि त्याने आपले बाहू खुले केले आहे.***

तो तुमची वाट पाहत आहे. म्हणूनच येशू ख्रिस्ताने क्रूसावर मरण पत्करले, जेणेकरून तो आपल्यासाठी मध्यस्थी करू शकेल आणि आपण ज्या गोष्टींमधून जात आहोत त्याची पूर्ण समज त्याला असेल. तो दूर नाही, किंवा निष्क्रिय नाही. तो अगदी जवळ आहे, आणि त्याचे बाहू तुमच्यासाठी खुले आहेत.

***म्हणून त्याला धरून राहा.***
***त्याची सेवा आवेशाने करा.***

असे जीवन जगा की, जे एक प्रेरणादायी वारसा मागे सोडू शकेल.

********

**ERROR**

In our August 2025 Article first page, first para, we mentioned as 75th Independence Day celebration wrongly instead of 79th Independence Day. - Chief Editor




**WANTED**



1. COMPUTER OPERATORS (with typing knowledge)
2. ASSISTANT PRINTING PRESS OPERATORS

Contact: ECHO OF HIS CALL (+91) 98412 71858, E.mail : sam@echoofhiscall.org


**सूचना:**

(+91) 98410 71858, (+91) 98412 71858 (मुख्य नंबर्स) हे नंबर्स तुमच्या मोबाईल फोनमध्ये संग्रहित करा - संपादक.

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**

Please subscribe

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.

**- Editor**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : | **1023 2934 679** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : | **Echo of His Call** |
| A/C No. | : | **6038 0502 2319** |
| IFSC | : | **ICIC 000 6038** |

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : | **1023 2923 805** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

E.mail : sam@echoofhiscall.org

## ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps (**Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.**) to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA

PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in

Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS Patrika Channel"**
**on 12th SEPTEMBER 2025.**
**If un-delivered please return to:**

**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**